प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## १.१ प्रस्तावना :

कोणत्याही समाजाचा सर्वांगिण अभ्यास करताना त्या समाजामध्ये समाविष्ठ असलेल्या घटकांचा, लहान मोठ्या समुदायांचा आणि त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. ज्या समाजामध्ये सांस्कृतिक भेद करणे शक्य आहे, असे बहुसंख्य आणि अल्पसंख्य समुदाय असतात तेव्हा त्या सर्वांचा अभ्यास केल्याशिवाय समाजाचा संपूर्ण अभ्यास होऊ शकत नाही. भारत हा एक विविधतेने नटलेला देश आहे. भारत देश हा जगाची प्रतिमा म्हणून ओळखला जातो. अशा या भारतामध्ये हिंदू धर्मियांची संख्या जास्त असून येथे मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौद्ध, शीख व पारशी इ.अल्पसंख्यांकही राहतात. भारतीय समाजाचे ग्रामीण, शहरी व आदिवासी अशा तीन विभागात विभाजन झाले आहे. या तिन्हीही विभागामधील जाती जमातोमध्ये संघटित वर्ग व असंघटित समुदाय असे फरक दिसून येतात. या असंघटित वर्गात प्रामुख्याने भटक्या जमाती, विमुक्त समाज, वेशीबाहेरचा मोठा अस्पृश्य समाज, आदिवासी समाज व देवदासी समाज यांचा अंतर्भाव प्रामुख्याने होतो. भारतीय समाजाचा संपूर्ण अभ्यास करताना विशेषत: राष्ट्राचा विकास व राष्ट्रीय एकात्मता यांच्या संदर्भात वरील सर्वांचा जाती जमातींचा विविध धर्मियांचा अभ्यास करणे जरूरीचे आहे. याच पार्श्वभूमीवर चंदगड तालुक्यातील माणगांव खेडयामधील वेरड विमुक्त जमातीचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय दृष्टिकोनातून समग्र अभ्यास, त्यांच्यातील सामाजिक संस्था व त्यांच्यात होत असणाऱ्या परिवर्तनाचा सूक्ष्म स्तरीय अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

भाषा, धर्म, जाती आणि भौगोलिक वैशिष्ट्ये याबाबतीत विविधता असणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे. या विविधतेतून दिसणारी एकता हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्ये आहे. परंतु हिच विविधता काही वेळा राष्ट्राच्या विकासातील, राष्ट्रीय एकात्मतेतील अडथळा ठरते. याच विविधतेमुळे भारतीय समाजात असंख्य समस्या निर्माण झालेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कित्यके शतके असंघटित व उपेक्षित राहिलेल्या जाती जमातींच्या सामाजिक व

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

आर्थिक प्रश्नांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टिकोनातून त्यांचे प्रश्न लवकरात लवकर सुटणे आवश्यक आहे.

भारतीय समाजातील ग्रामसंस्था म्हणजेच 'गावगाडा' ही व्यवस्था फार प्राचीन आहे. या संस्थेची निर्मिती मानवी गरजांतून झाली आहे. तसेच समाजातील गटांमधील अर्थसंबंध व परस्पर आश्रयाचे संबंध यावरच ती आधारलेली दिसून येते. परंतु अनेक शतके गावगाड्याच्या आश्रयाने जगत असूनही काही जमाती व जाती अत्यंत निम्न दर्जाचे जीवन जगत होत्या आणि सद्यपरिस्थितीतही जगत आहेत. त्यामुळे त्यांचा अभ्यास करणे हे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामसंस्थेतील बलुतेदारी पद्धती व जाती व्यवस्था यांच्या घट्ट पकडीमुळे अशी एक बळकट किंवा भक्कम समाजव्यवस्था निर्माण झाली की या समाजव्यवस्थेमध्ये भटक्या जाती-जमाती, विमुक्त जाती-जमाती शिरकाव करू शकल्या नाहीत. त्या सदैव बाहेरच फेकल्या गेल्या.

## १.१ भारतीय समाजाची विभागणी :

"भारताच्या संदर्भात काळाच्या गरजेनुसार समाजाची विभागणी होत गेली आणि समाजाची शतके झाली. कोणत्याही एखाद्या गावात एक सवर्ण समाज, जो इतरांकडून आपल्यासाठी श्रम करून घेत होता, घेत आहे. दुसरा या समाजाची सेवा करणारा अथवा रावणारा अस्पृश्य व कनिष्ठ मानला गेलेला वर्ग. समाजाचा तिसरा वर्ग डोंगरकपारीत राहणारा वनवासी आणि चौथा अन्नाच्या शोधासाठी रानोमाळ भटकणारा व कोणतेही व्यवस्थित जीवन नसणारा भटका वर्ग, यापैकी सवर्ण समाज गेली शतकानुशतके कायमच श्रेष्ठ राहिला."[१] अस्पृश्य समाज व वनवासी जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजासाठी जनजागरण व कल्याण कार्यक्रम राबविणाऱ्यांचे प्रमाण वाढत गेले आणि त्यांच्या विकासासाठी वेगवेगळया पातळीवर प्रयत्न झाले. या सर्व परिस्थितीत भटका समाज मात्र दुर्लक्षित राहात गेला. त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी फारसे संघटित प्रयत्न आतापर्यंत झाले नाहीत. कारण हा समाज कोठेच एके ठिकाणी स्थिर नव्हता. त्यामुळे त्यांची संख्या अगदी काटेकोरपणे मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. अलिकडे मात्र गेल्या दोन-तीन दशकात या वर्गातीलच काही जागरूक व्यक्ति

नवजीवन जगण्यासाठी झटत आहेत, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध संघर्ष करत आहेत. यातून त्यांच्यातील 'स्व'ची जाणीव व दुर्लक्षित वृत्तीचे उच्चाटन करण्याची त्यांची वृत्ती उफाळून येत आहे. राज्याच्या घटनेतील तरतुदींचा व समाजातील सहानुभूती असणाऱ्या लोकांचा त्यांना पाठिंबा मिळू लागल्याने आज या वर्गाकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

### १.१.१ भटक्या विमुक्त जमाती (Nomadic Denotified Tribe):

" 'भटके' (Nomadic) या शब्दाची उत्पत्ती 'नेमो' (Nemo) या ग्रीक शब्दापासून झाली आहे. त्याचा अर्थ 'चारणे' विविध जनावरांना घेऊन जेथे चारा उपलब्ध होईल तेथे नेण्याच्या प्रवृत्तीपासून एक समाज तयार झाला. या निमित्ताने हिंडणारा व पुढे आपल्याही उपजीविकेसाठी भटकणारा तो भटका (Nomadics) समाज बनला. "उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या अगर वाट्यास आलेल्या व्यवसायानिमित्त अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणाऱ्या लोकांना 'भटके' म्हणतात." इंग्रजीत त्यांचा उल्लेख 'नोमॅडस्' असा करतात."[२]

"स्वत:चे कायम स्वरूपाचे घर अथवा शेतजमीन नाही, परंतु गुरांचे कळप आहेत. असे लोक गुरांसाठी चराऊ रानांच्या, कुरणांच्या शोधार्थ सतत भटकत असतात. अशा लोकांना उद्देशून नोमॅडस् हा शब्द वापरला जातो."[३]

"Nomad - One who leads a wandering or pastoral life, one a tribe that wanders about in quest of game or of pasture and has no fixed habitation."[४]

"The Pocket Oxford Dictionary मध्ये 'Nomad' - member of tribe roaming from place for pasture, wanderer' असा उल्लेख आढळतो."[५]

" 'द रॉयल अँथ्रॉपॉलॉटिकल इन्स्टिट्यूट ऑफ ग्रेट ब्रिटन' या संस्थेनेही अशीच व्याख्या केली आहे की, "कोणतेही निश्चित निवासस्थान नसलेला आणि शिकार अथवा अन्न गोळा करीत हिंडणे हेच ज्यांचे प्रमुख जीवन असून त्यावरच ते अवलंबून असतात अशा लोकांचा समाज हा भटका समाज."[६] यातूनच आपल्या चरितार्थासाठी इतर व्यवसाय करणारे लोकही भटक्या समाजात सामील होत गेले. आणि अशा विविध व्यवसायधिष्ठित समाजांचा एक फार

मोठा वर्ग निर्माण झाला. हा शब्द किंवा संकल्पना फक्त जंगलात भटकणाऱ्या लोकांसाठी न वापरता एकाच ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता सतत भटकंती करणाऱ्या लोकांसाठी ही वापरली जाते. खेचरे, गाढवे, तट्टू, घोडे, उंट इत्यादींवर आपले साहित्य किंवा मालमत्ता लादून स्वत:च्या इच्छेनुसार किंवा परिस्थितीस्थिच्या दडपणामुळे स्वत:ची व आपल्या कुटुंबातील इतर व्यक्तींची चांगली उपजिविका होऊ शकेल अशा ठिकाणांच्या शोधात लोक सतत स्थलांतर करीत भटकत राहतात. डोंबाऱ्याचे खेळ, जादूचे खेळ, भविष्य कथन, किरकोळ व्यापार, कारागिरी, वैद्यकी इ. स्वत:चा उदरनिर्वाह करण्याकरिता नाइजास्तव ते करतात. अशा सतत भटकणाऱ्या समुहाव्यतिरिक्त असे आणखी काही समूह आहेत की जे अर्ध-भटके जीवन जगतात. अशा समूहांजवळ स्वत:चे घर किंवा थोडीफार शेत जमीन असते आणि शेतीचा हंगाम संपला की जेथे उदरनिर्वाहासाठी लागवडीला जिथे योग्य जमीन उपलब्ध असेल तेथे हे समुह आपल्या कुटुंबियांसह आणि सामानासह ते स्थलांतर करतात. तेथील हंगाम संपला की ते पुन्हा आपल्या मूळ ठिकाणी येतात.

"अमेरिका आणि युरोप खंडात असे भटके जीवन जगणाऱ्या जमातींना 'जिप्सी' म्हणतात."[७] 'जिप्सी' हा शब्द इजिप्शियन ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे असे काही तज्ज्ञांच्या मतावरून निदर्शनास येते. जिप्सी हे भारतातूनच आले असावेत असेही काही तज्ज्ञांचे मत आहे. भारतामधून दोन हजार वर्षापूर्वी जिप्सी लोकांनी युरोप-अमेरिकेकडील देशात स्थलांतर केले असे म्हटले जाते. जुलमी आक्रमणाला शरण न जाता आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आणि स्वाभिमानाला उणेपणा येऊ नये, यासाठी जिप्सींना स्थलांतर करावे लागले असे अभ्यासाअंती स्पष्ट होते.

## १.१.२ भारतामधील भटक्या जमातींचे वर्गीकरण :

"काळानुसार ज्या जमाती इतर समाजासाठी कष्ट करीत गेल्या, त्याही भटकतच राहिल्या काही जमाती शेती करू लागल्या. पण त्या जमिनीतील कस कमी झाला, पीक मिळनासे झाले की, आर्थिक कमकुवतपणामुळे त्या जमाती दुसरीकडे स्थलांतरीत होत

राहिल्या. अशा या विविध प्रकारचे आर्थिक जीवन जगणाऱ्या जमातींचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.

१. अन्न गोळा करीत हिंडणाऱ्या जमाती  २. प्राणी पाळणाऱ्या जमाती

३. छोटे व्यवसाय करणाऱ्या जमाती  ४. भिक्षा मागणाऱ्या जमाती

५. परंपरेने भटक्यांचे जीवन जगणाऱ्या जमाती"[८]

वरील जमातीपैंकी भारतीय समाजात स्थूल मानाने पुढील काळात तीन प्रकारच्या जमाती मानल्या गेल्या.

## I. गावगाड्याला आवश्यक असणाऱ्या जमाती :

काही भटक्या जमाती गावामध्ये असलेल्या इतर जाती-जमातींसाठी कामे करतात. उदाहरणादाखल पहायचे तर एखाद्या गावात मंदिराचे काम निघाले की, बेलदार त्या गावात मुक्काम करतो आणि ते काम पूर्ण झाले की, पुढच्या गावाला जातो. शेतीच्या कामाला व घराला उपयोगी पडणाऱ्या वस्तू-विळा, कोयता, कडी-कोयंडा तयार करणारा घिसाडी हा गावोगावी भटकत असतो. घराचे बांधकाम करण्यासाठी वडार समाज सगळीकडे फिरत असतो. जडीबुटी देणारा वैदूही एका ठिकाणी राहात नाही. कणग्या, टोपल्या करून विकणारा कैकाडी दहा गावात हिंडून आपले पोट भरतो. त्याचप्रमाणे सेवाकाम करणाऱ्या भटक्या जमाती धान्य, मीठ आणि इतर वस्तू ज्या ठिकाणी स्वस्त उपलब्ध असतील तेथून ते खरेदी करतात आणि ज्या ठिकाणी त्या वस्तु दुर्मिळ असतील तेथे थोडाफार नफा घेऊन ते विकतात. तसेच दोर, चटया तयार करणे, विकणे, औषधे विकणे, लोहार काम करणे, मोलमजुरी करणे, चाकू, सूरी, कात्री यांना धार लावणे इ. कामेही ते करतात.

## II. मनोरंजन करणाऱ्या जमाती :

पूर्वीच्या काळी खेड्यामध्ये करमणूकीची साधने उपलब्ध नव्हती. साहजिकच काही जमातींमधील लोक आपल्या अंगचे कौशल्य दाखवून त्यावर आपले पोट भरीत असत. परंतु पण पुढे हाच त्यांचा जीवनक्रम बनला. आजही त्यांच्या या परिस्थितीमध्ये फारसा फरक पडलेला दिसत नाही. या जमाती गावोगावी जातात आणि अन्न मिळवितात. नंदीबैलवाला

गुबूगुबू करीत लहान मुलांची, वृद्धांची करमणूक करतो. लोक बैल म्हणजे नंदीचा अवतार असे समजून त्याची पूजा करतात. थोडे बहुत धान्य बैलाच्या मालकाला देतात. त्यावर दोघांचीही कशीबशी गुजराण ते करतात. गारूडी, माकडवाला, अस्वलवाला, डोंबारी हे याच परिस्थितीत आपले जीवन जगतात. कोल्हाटी-डोंबारी या जमाती आपले जीवन धोक्यात घालून लोकांचे मनोरंजन करतात. अशा कित्येक जमाती आजही आपल्याला पाहायला मिळतात.

## III. भिक्षा मागणाऱ्या जमाती :

भारतीय समाजामध्ये अशा काही जमाती आहेत की ज्या भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करतात. जोगी, गोसावी जमाती यात मोडतात. लोकांना दया येऊन त्यांनी दिलेल्या भिक्षेवर या जमाती आपले जीवन जगत असतात. फक्त पोट भरणे आणि येईल तो दिवस पुढे ढकलणे एवढीच या जमातींची माफक अपेक्षा असते.

महाराष्ट्र शासनाने या सर्व जातींची पाहणी करून भटक्या विमूक्त जमातींची वर्गवार यादी केली आहे, ती पुढीलप्रमाणे.

**"१. भटक्या जमाती :**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | गोसावी | १५ | मैराळ |
| २ | वेलदार | १६ | नंदीवाले |
| ३ | भराडी | १७ | पांगूळ |
| ४ | भुते | १८ | रावळ |
| ५ | चित्रकथी | १९ | सिक्कलगर |
| ६ | गारूडी | २० | ठाकर |
| ७ | घिसाडी | २१ | वैदू |
| ८ | गोल्ला | २२ | भोई |
| ९ | गोंधळी | २३ | वहुरूपी |
| १० | गोपाळ | २४ | ठेलारी |
| ११ | हेळवे | २५ | ओतारी |
| १२ | जोशी | २६ | वासूदेव |
| १३ | काशी कापडी | २७ | मसणजोशी |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | कोल्हाटी | २८ | चलवादी"[९] |

"२. विमूक्त जमाती :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बेरड | ८ | राजपारधी |
| २ | भेस्तर | ९ | राजपूत भामटा |
| ३ | भामटा | १० | रामोशी |
| ४ | कैकाडी . | ११ | वडार |
| ५ | कंजारभाट | १२ | वाघरी |
| ६ | कटाबू | १३ | छप्पर बंद |
| ७ | वंजारा | १४ | पाथरवट"[१०] |

"भारतामध्ये इतर प्रांतापेक्षा महाराष्ट्रात भटक्या जाती जमातींचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रात म्हणून ४२ भटक्या विमुक्त जमाती आहेत. त्यापैकी २८ भटक्या व १४ विमुक्त जमाती आहेत."[११] या ४२ जमातींच्या पोटजातींची संख्या २०० पर्यंत आहे. त्यामध्ये संस्कृतीने, भाषाने, व्यवसायाने, रूढी, परंपरेने औद्योगिक कारणाने आणि स्वत:हून वेगळेपण स्विकारलेले असे भटक्यांचे समूह दिसून येतात.

## १.१.३ काही जमातींची घटक राज्यानुसार केलेली विभागणी :

सारणी क्र. १.१

'काही जमातींची घटक राज्यानुसार केलेली विभागणी दर्शविणारी माहिती'[१२]

| | बंजारा | वडार | कैकाडी | पारधी | कंजारभाट | बेरड |
|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | S.T. | S.C. | S.C. | S.C. | S.C. | S.C. |
| कर्नाटक | S.C. | S.C. | S.C. | S.T. | S.T. | S.T. |
| दिल्ली | S.C. | S.C. | S.C. | S.T. | S.T. | S.C. |
| उत्तरप्रदेश | O.B.C. | O.B.C. | S.C. | S.T. | S.T. | S.T. |
| ओरिसा | S.T. | S.C. | S.C. | S.T. | S.T. | S.C. |
| बंगाल | S.T. | S.T. | S.T. | S.T. | S.T. | S.C. |
| बिहार | S.T. | S.T. | S.C. | S.T. | S.T. | S.T. |
| गुजरात | S.T. | S.T. | S.C. | S.T. | S.T. | S.T. |
| हिमाचल प्रदेश | S.C. | S.C. | S.C. | S.T. | S.T. | S.T. |
| राजस्थान | S.C. | S.C. | S.C. | S.T. | S.T. | S.C. |
| महाराष्ट्र | DNT | DNT | DNT | S.T. | DNT | DNT |
| तामिळनाडू | DNT | DNT | S.C. | S.T. | DNT | DNT |

वरील तक्त्यामध्ये काही जमातींची वेगवेगळ्या घटक राज्यामध्ये वेगळ्या जातीमध्ये समावेश केलेल्याची माहिती दिलेली आहे. निवडक अशा जमातींची (उदा.वंजारा, वडार, कैकाडी, पारधी, कंजारभाट व वेरड इ.) घटक राज्यानुसार वेगवेगळ्या जातीमध्ये झालेल्या विभागणीविषयाच्या माहितीवरून असे निदर्शनास येते की काही जमातींची विभागणी काही घटक राज्यामध्ये अनुसूचित जाती म्हणजे S.C. तर त्याच जमातीची विभागणी काही घटक राज्यामध्ये अनुसूचित जमाती म्हणजे S.T. मध्ये केलेली आहे. काही जमातींची विभागणी इतर राज्यामध्ये इतर मागासवर्गीयांमध्ये म्हणजेच O.B.C मध्ये तर त्याच जमातींची काही घटकराज्यामध्ये भटक्या जमाती व विमुक्त जमातीमध्ये म्हणजेच DNT मध्ये केलेली आहे. वरील जमातीपैकी आपण फक्त वेरड या जमातीची घटकवार झालेली विषम विभागणी पाहणार आहोत. बेरड जमातीची विविध घटकराज्यात विविध जातीमध्ये झालेली विभागणी पुढीलप्रमाणे...

बेरड ही जमात महाराष्ट्रामध्ये विमुक्त जमात म्हणून ओळखली जाते. तिचा सध्या महाराष्ट्रात De-notified Tribe (DNT) म्हणून समावेश केलेला आहे. इतर घटकराज्याचा विचार केल्यास बेरड या जमातींचा समावेश वेगवेगळ्या जातीमध्ये केल्याचे आढळते.

बेरड या जमातीचा समावेश आंध्रप्रदेश, दिल्ली, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि राजस्थान या घटकराज्यात अनुसूचित जाती म्हणजेच S.C. मध्ये केलेला दिसतो तर कर्नाटक, उत्तरप्रदेश, बिहार, गुजरात, हिमाचल प्रदेश इत्यादी घटक राज्यामध्ये तीचा समावेश अनुसूचीत जमातीमध्ये म्हणजेच S.T. मध्ये केलेला दिसतो. तर तमिळनाडू मध्ये तिचा समावेश De-notified Tribe म्हणजे DNT मध्ये केलेला दिसतो.

वरीलप्रमाणे बेरड जमाती वरोवरच इतर जमातींचाही वेगवेगळ्या घटकराज्यात वेगवेगळ्या जातीमध्ये समावेश केलेल्याचे दिसते. तेव्हा वरील जमातींची झालेली विभागणी पाहता या विभागणीमध्ये खूपच विषमता जाणवते. तसेच या विभागणीतून असे दिसून येते की राज्यशासन आणि केंद्रशासन यांच्या दृष्टीकोनामध्ये आणि झालेल्या संशोधनामध्ये व तपासणीमध्ये तफावत आढळते. घटकराज्याला दिलेल्या हक्कानुसार किंवा अधिकारानुसार

प्रत्येक घटकराज्याने वेगवेगळ्या बाबींचे निकष वेगवेगळ्या जमातीला लावून त्या जमातींचा समावेश वेगवेगळ्या जातीमध्ये केलेला दिसतो. यावरून देश प्रदेशत्वावरून लावलेले निकष हे वेगवेगळे दिसतात. म्हणूनच ही झालेली विभागणी वेगवेगळी वाटते.

वरीलप्रमाणे प्रत्येक घटकराज्याने वेगवेगळे निकष लावून वेगवेगळ्या जमातींचा वेगवेगळ्या जातीमध्ये समावेश केल्याने याचा परिणाम म्हणजे काही जमातीवर अन्याय झालेला दिसतो. सद्यपरिस्थितीचा विचार केल्यास महाराष्ट्रातील बेरड जमातीवर अन्याय झालेला दिसतो. सदर जमात ही काही घटक राज्यात ती अनुसूचित जाती व काही घटक राज्यात ती अनुसूचित जमातीमध्ये मोडते परंतु महाराष्ट्र व तमिळनाडू या घटकराज्यात मात्र ती विमुक्त जमातीमध्ये मोडते. तेव्हा इतर घटक राज्यातील बेरड जमातींची आणि महाराष्ट्रातील व तामिळनाडूतील बेरड जमातींची तुलना केल्यास त्यांना मिळणाऱ्या सोयी, सवलती आणि राखीव जागा व इतर घटकामध्ये असलेल्या स्थानात खूप फरक आढळतो.

## १.१.४ भटक्या जमातींवर हिंदू धर्माचा पडलेला प्रभाव :

भारतामधील भटक्या जमाती हया हिंदू धर्माचे अनुकरण करीत असलेल्या दिसतात. “व्यवसायानिमित्त भटकत असताना स्थानिक हिंदू धर्मियांशी या भटक्यांचा सतत संपर्क येत राहिल्यामुळे कळत-नकळत त्यांच्याकडून हिंदू संस्कार अंगीकारले गेले असावेत. हिंदू धर्मियांतील पाप-पुण्य या संकल्पनांवर त्यांचा विश्वास दिसून येतो. राजा व राजसत्ता यांनी अंगिकारलेल्या धर्माचा प्रभावही काही भटक्या जमातीवर झालेला दिसून येतो. उदा. काश्मिर आणि हिमाचल प्रदेशातील गुज्जर सारख्या काही भटक्या जमातींनी इस्लाम धर्म स्विकारला.”[१३]

## १.१.५ भटक्या जमातीमधील कुटुंब व विवाह पद्धती :

भारतीय समाजामध्ये राहणाऱ्या भटक्या जमातींमध्ये प्रामुख्याने पितृसत्ताक कुटुंब पद्धती असून यांच्यामध्ये एक पत्नीत्वाची प्रथा रूढ आहे. परंतु पहिली पत्नी दीर्घकाळ आजारी असेल, तिला वंध्यत्व आले असेल किंवा तसेच काही महत्त्वाचे कारण असेल तर दुसरी पत्नी करण्याची त्यांना मुभा आहे. भटक्या जमातीतील मुसलमान हे एकापेक्षा अधिक बायका करताना दिसतात. परंतु एकच पत्नी करण्याचे प्राय: सर्व भटक्या जमातींचा कल दिसून

येतो. मुसलमान भटके वगळता इतर भटक्या जमातींमध्ये हिंदू विवाह पद्धती रूढ असल्याचे दिसते. भारतातील काही भटक्या जमातीत विधवा विवाह, घटस्फोट आणि विभक्त कुटुंव पद्धती या गोष्टींना परवानगी दिली जात नाही.

## १.१.६ भारतातील पारंपरिक समाजामधील सामाजिक-आर्थिक व्यवहारात भटक्यांचे स्थान :

भारतातील पारंपरिक समाजामधील सामाजिक-आर्थिक व्यवहारात भटक्यांचे स्थान अत्यंत नगण्य आहे. पूर्वीच्या काळी म्हणजे प्राचीन काळी वस्तूंचे सेवांचे मूल्य हे प्रामुख्याने पैशाच्या स्वरूपात न ठरवता धान्याच्या रूपात ठरवले जात होते. म्हणजेच वस्तू व सेवा यांचे परस्पर विनिमयाच्या स्वरूपात व्यवहार पार पाडले जात असत. भटक्या जमाती हया त्यांच्या व्यवसायानिमित्त अनेक ठिकाणी भटकताना दिसतात. तेंव्हा या एकमेव कारणांमुळे भटक्या जमातींना सामाजिक-आर्थिक व्यवहारात महत्त्वाचे स्थान लाभले नाही.

## १.१.७ आधुनिकीकरण व औद्योगिकरण या प्रक्रियांचा भटक्या जमीतींवरील परिणाम:

आधुनिकीकरण आणि औद्योगिकरण या प्रक्रियांचा भारताच्या पारंपरिक समाजजीवनावर जसा परिणाम झाला तसा भटक्या जमातीवरही झालेला दिसून येतो. औद्योगिकरणासाठी जेंव्हा जंगल तोड करून जागा उपलब्ध करून देण्यात आली तेव्हा जंगल तोडीमुळे गवताची कुरणे हळूहळू नष्ट होऊ लागली. जळणासाठीही जंगलतोड मोठया प्रमाणात होऊ लागली. याचा परिणाम असा झाला की जंगले ओसाड झाली. याचा दूरगामी परिणाम भटक्या जमातींच्या व्यवसायावर झाला. त्यांच्या गुरांना चरण्यासाठी कुरणे अपूरी पडू लागल्यामुळे गुरांचे कळप वाळगणे त्यांना कठीण होऊ लागले. साहजिकच गुरांपासून मिळणारी उत्पादने कमी झाली. जंगलातील लागवडीखाली असणाऱ्या जमिनीवावत वेगवेगळया प्रकारची वंधने आली. साहजिकच भटक्या जमातींना जमिनी कसणे अशक्य झाले. याचा परिणाम म्हणजे भटके व्यवसायहीन वनले. शेवटी काही भटक्या जमाती मोलमजुरी करू लागल्या, काही टाकाऊ उद्योग करू लागल्या तर काही जमाती भीक मागून आपले पोट भरू लागल्या.

"आधुनिकीकरणाचा भटक्यांच्या आचार विचारांवर फारसा परिणाम झालेला दिसून येत नाही. पण अलिप्तपणामुळे त्या मागास बनल्या. यातून काही जमाती गुन्हेगार बनल्या व पुढे गुन्हेगार म्हणूनच ओळखल्या जाऊ लागल्या."[१४]

## १.१.८. विमूक्त जमातींची पार्श्वभूमी :

भारतामध्ये सुमारे पन्नास हजार वर्षापूर्वी मानवी समाजाची उच्चतर संस्कृती नांदत होती असे माहेंजोदडो आणि हडप्पा येथे उपलब्ध झालेल्या पुराव्या वरून सिद्ध झाले आहे. त्याकाळची नगररचना, सौंदर्यकल्पना, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र , वैद्यशास्त्र, गणित, भूगोल, तत्त्वज्ञान, राजकारण, अर्थकारण, वाङ्मय, धर्मशास्त्र इत्यादीत निपुण असा मानव समाज विकसित स्वरूपात येथे होता. हिंदु धर्मीयांचा मूळ धर्मग्रंथ 'ऋग्वेद संहिता' हा तीन ते पाच हजार वर्षापूर्वीचा मानला जातो. पाण्यातील अमिवापासून प्रथम जलचर त्यानंतर वनचर, खग आणि मानव ही जीवशास्त्राची आधुनिक कल्पना त्यावेळच्या हिंदूधर्मातील अवतार या कल्पनेशी मिळती-जुळती आहे. निसर्गातील गुढ ओळखून मानवाने मिळविलेल्या अनेक विजयांची प्रसादचिन्हे या काळातील मानवास ज्ञात होती असेही सिद्ध झालेले आहे.

त्यानंतरच्या पुढील काळातही भारतामध्ये अनेक समृद्ध राज घराणी शेती आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रगत होती. परंतु ही राजघराणी नगरराज्ये होती. इंग्रजी राज्याच्या आणि यंत्रयुगाच्या सुरूवातीपर्यंत या मानव समूहांचा फारसा चिकित्सक अभ्यास झाल्याचे दिसून येत नाही. मराठी सत्तेच्या अखेरच्या आणि इंग्रजी सत्तेच्या सुरूवातीच्या काळात भारतीय समाजामध्ये सुव्यवस्थित राज्यव्यवस्थाच अस्तित्वात नव्हती. इंग्रजांचे लक्ष मुख्यत: व्यापारवृद्धी आणि राज्य याकडे होते तर एतद्देशीय राजे आपापसात किंवा इंग्रजांबरोबर लढाया करत होते. याचा परिणाम म्हणजे राज्याच्या सुव्यवस्थेकडे कोणाचेच लक्ष नसलेल्या काळात उत्तर भारतात ठगांचा आणि दरोडेखोरांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट झाला होता. परिणामी जनजीवन अस्ताव्यस्त झाले होते.

अलेक्झांडरच्या आक्रमणापूर्वी या देशामधील आदिम मानल्या गेलेल्या जमाती विषयीची कुठलीही माहिती उपलब्ध होत नाही. गुन्हेगार जमातींचे मूळचे वंशज कोण? ते लोक गुन्हेगार

केव्हा, कसे व का झाले ? इत्यादी वावतची माहिती सद्यपरिस्थितीत ही उपलब्ध नाही.

"अलेक्झांडरच्या स्वारीनंतर कागदोपत्री थोडाफार पुरावा उपलब्ध होतो. प्रा.सेरसिंग यांनी पंजाबच्या खामी या जमातीचा अभ्यास करून अशी माहिती दिली की, भारतात या जमातीची दखल सर्वप्रथम १७७३ साली घेण्यात आली आणि त्यानंतर गुन्हेगारीच्या संदर्भातला पहिला कायदा १७९३ साली झाला. या कायद्याच्या १६ व्या रेग्युलेशन प्रमाणे व्यक्तिगतरित्या किंवा गटाने केलेल्या गुन्ह्यांना शासन करण्याची तरतूद झाली. एका अर्थाने हिंदूस्थानात लॉ अँड ऑर्डरचे राज्य खऱ्या अर्थाने सुरू झाले. यापूर्वी गुन्हेगारीच्या संदर्भातले कागदोपत्री पुरावे दिसत नाहीत.या कायद्यामध्ये १९३६ साली थोडा बदल झाला. कलम ३० अन्वये गुन्हेगारांना शिक्षा ठोठावल्या जावू लागल्या."[१५] ब्रिटिशांचे एकच ध्येय होते ते म्हणजे कायदा आणि सुव्यवस्था पहाणारे एक कायद्याचे राज्य अशी स्वत:ची प्रतिमा हिंदुस्तानात उभी करणे होय.

## १.१.९ भटक्या जमातींना डोंगरदऱ्यांचा आधार किंवा आश्रय :

१८४३ साली इनाम कमिशन आले. या कमिशनने वतने, इनामी जमिनी, जहागिऱ्या, जप्त केल्यामुळे देशी संस्थानिक, वेकार झाले. या सगळ्यांचे सर्वस्व ब्रिटिशांनी हिरावून घेतले. पुढे गुन्हेगारांच्या यादीत आलेले रामोशी, वेरड, वेस्तर, नाईक, नाईकवडी, तलवार इ. संस्थानिक याच कायद्याने वेकार केले गेले. बेकारी आल्यामुळे हे सर्व गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळले. यामध्ये मयूरचे नायक घराणे, तंजावरचे नायक घराणे, कालहस्तीचे नायक घराणे, सोलापूरचे गुलबर्गा संस्थान, केळदी सिमोगाचे नायक घराणे, कणकगिरी संस्थान अशी लहान मोठी अनेक संस्थाने हिंदुस्तानात खालसा झाली. १८१८ ला पेशवाई वुडाली. मराठी सैन्यातही या जमातींचा मोठा भरणा होता. अशा रितीने देशी संस्थानिकांशी एकनिष्ठ असलेला फार मोठा फौजफाटा वेकार तांड्याच्या स्वरूपात फिरत होता. १८५७ साली ब्रिटिशांच्या विरूद्ध पहिले स्वातंत्र्य युद्ध झाले आणि या युद्धाची पूर्वपिठीका संस्थाने खालसा करणे, दत्तक वारसा नामंजूर करणे या स्वरूपाचीच होती. या युद्धामध्ये देशी संस्थानिकाकडील वेकार झालेल्या सैनिकांनी कडवी झुंज देऊन ब्रिटिशांना मोठा आर्श्चयाचा धक्का दिला. कारण हा उठाव हिंदुस्तानामध्ये स्वयंस्फूर्त होता, व्यापक होता. या लढ्याचा कुणी एक नेता नव्हता परंतु या

लढ्याचे स्वरूप ब्रिटिशांनी हेरले व अतिशय मुत्सद्दीगिरीने पावले टाकावयास सुरूवात केली. याच काळात भारतीय समाज खुपच असुरक्षित झाला. कारण १८५७ पर्यंत हिंदुस्थानामध्ये नागरिकांना स्वसंरक्षणासाठी इतरांच्या आक्रमणापासून स्वत:वरच अवलंबून रहावे लागत असल्यामुळे हत्यारे, शस्त्रास्त्रे जवळ वाळगता येत होती. १८५८ साली ब्रिटिशांनी शस्त्र वाळगण्याविरूद्ध प्रतिवंधक कायदा केला. लोकांना पूर्वापार वाळगता येणारी शस्त्रे वाळगता येईनाशी झाली. त्यामुळे लोक स्वसंरक्षणासाठी डोंगर, दऱ्या, खोरी, जंगले धुंडाळू लागले. एका अर्थाने या टोळ्या सैर-भैर झाल्या. त्यांनी स्वत:ला इतरांपासून तोडून घेतले आणि डोंगर-दऱ्यात लपून-छपून राहू लागले. इंडियन पिनल कोडमध्ये १८६० मध्ये दुरूस्ती झाली आणि या जाती जमातीतील गुन्हेगारी केलेल्या व्यक्तींना किंवा संपूर्ण गटाला शासन करण्याची तरतूद करण्यात आली.

## १.१.१० भटक्या जमाती गुन्हेगार ठरल्या:

"१८७१ मध्ये एखादी संपूर्ण जमात गुन्हेगार म्हणून जाहिर करण्याचे अधिकार गुन्हेगार जमातीचा कायदा अंमलात आणून शासनाला देण्यात आला. हाच तो कलंकीत '१८७१ सालचा क्रिमीनल ट्राईब्ज ॲक्ट'. हा कायदा १८७१ साली अंमलात आला असला तरी एकूण समाजाची आणि शासनाची पावले ह्या दृष्टीने १७९३ पासूनच पडत होती. या कायद्यामुळे जमातीच्या जमाती या गुन्हेगार जमाती म्हणून समजल्या गेल्या. गुन्हेगारी हा या जमातींचा स्थायी भाव बनला. या जमातींच्या लोकांवर सर्व प्रकारची वंधने लादली गेली. त्यामुळे जमातीच्या-जमाती, टोळ्याच्या-टोळ्या व्यापक समाजापासून वेगळ्या पडल्या गेल्या. प्रारंभी हा कायदा सिंध, पंजाव व अवध मध्ये होता. तो हळूहळू भारतातील सर्व तत्कालीन प्रांतीक सरकारानी स्विकारला. १८७६ मध्ये कायद्यात वदल झाला. या वदलाने स्थानिक, प्रादेशिक सरकारकडे या जातींना गुन्हेगार जाती म्हणून घोषित करण्याचे अधिकार देण्यात आले."[१६]

## १.१.११ भटक्या जमातींवर जाचक निर्बंध :

"१८८७ मध्ये गुन्हेगार जमातींच्या कायद्यात वदल होऊन गुन्हेगार म्हणून घोषीत झालेल्या जमातीतील ४-१८ वयोगटातील मुलांना पालकांपासून अलग करण्याचा अधिकार

शासनाला प्राप्त झाला. एखाद्या जातीत वा जमातीत गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आढळले तर संपुर्ण जातीचे लोक गुन्हेगार म्हणून गृहित धरून त्यांचेवर जाचक निर्बंध घालण्याचे अधिकार सरकारला मिळाले. एकाच गुन्हेगाराकडून गुन्ह्यांची पुनरावृत्ती घडली तर वाढीव व कठोर शासन करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली. १९११ साली या कायद्यात पुन्हा दुरूस्ती झाली. बालकांच्या वयाच्या ४ वर्षाऐवजी ६ वर्षापासून पालकापासून अलग करण्यात येऊ लागले. बालकासंबंधी किंचित हळूवारपणाची झुळूक या दुरूस्तीत असली तरी गुन्ह्यांना अत्यंत कठोर शासनाची तरतूद होती या कायद्याने गुन्हेगारांचे नवीन वर्ग तयार करण्यात आले."[१७]

१. जे मुळचे गुन्हेगार परंतु ज्यांच्यात पुढे सुधारणा झाली. मुळ गुन्हेगार म्हणून घोषीत झालेले काही न सुधारता गुन्हेगारीच करत राहिले असे गुन्हेगार जमातीतील सुधारलेले, न सुधारलेले असलेले लोक.

२. अशा जमाती ज्यांनी वरकरणी कोणतातरी व्यवसाय स्विकारला परंतु संधी मिळेल तेव्हा त्यांच्यापैकी काही चोऱ्या दरोडे इ.स्वरूपाचे गुन्हे करीत राहिले आणि त्यांच्यावर गुजराण करीत राहिले.

३. भटक्या जमाती ज्या कुठेही स्थायी जीवन जगत नाहीत आणि संधी मिळताच त्यातील लोक गुन्हे करतात. या निरनिराळ्या स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या व गुन्ह्यांचे निरनिराळे तंत्र अवलंबणाऱ्या जमातीशी कसे वागावे, त्याचा बंदोबस्त कसा करावा या संबंधी पोलीसांना विस्तृत मार्गदर्शन केले आहे. या संबंधी १९०८ साली मुंबई इलाख्याच्या शासनाने एक पुस्तक प्रकाशित केले आहे.

### १.१.१२ भटक्या जमातींचा काळा कायदा:

कायद्यात पुन्हा थोडी सुधारणा करण्यात आली ती १९२४ साली आणि या कायद्याने प्रथमत:च गुन्हेगार जमातींच्या लोकांनी केलेल्या गुन्ह्यांची प्राथमिक चौकशी करण्याची तरतूद केली होती. म्हणजेच १८७१ ते १९२४ या त्रेपन्न वर्षाच्या काळात या जमातीनी गुन्हा केला नाही याची प्राथमिक चौकशीही होत नसे हे भयानक चित्र १९२४ च्या कायद्याद्वारे स्पष्ट होते. या गुन्हेगार जमाती कायद्याप्रमाणे गुन्हेगार जमातीतल्या व्यक्तींचा भयानक छळ सुरू झाला.

या कायद्यानुसार गुन्हेगार जमातीच्या प्रत्येक व्यक्तीने स्वत:ची नोंद करून प्रत्येकाने बोटाचे ठसे घेऊ दिले पाहिजेत असे वंधन घालण्यात आले. भटक्या जमातींना स्थलांतर करायचे असेल तर स्थलांतराची अगाऊ कल्पना स्थानिक पोलिस अधिकाऱ्याला दिली पाहिजे. तेव्हा यावरून असे स्पष्ट होते की, गुन्हेगार जमातींच्या व्यक्तीच्या किंवा जमातीतील संपूर्ण गटाच्या प्रवासावर निर्बंध घालण्याची सोय कायद्यात अंतर्भूत झाली होती. या कायद्यामुळे भटक्या जमातीतील लोकांची हजेरी लागत असे. कायदा व सुव्यवस्थेच्या नावाने चाललेला हा तमाशा सुरू झाला. या जमातीपासून इतरांचे संरक्षण करण्याच्या नावाखाली या संपूर्ण जमातींच्या जमातींना बराकी बनवण्यात आल्या. या जमाती म्हणजे सर्व समाजाचे शत्रू समजण्यात आले. भटक्या आणि विमुक्त जमातींच्या जमाती व्यापक समाजापासून तोडून त्यांच्या वेगळ्या वसाहती निर्माण करण्यात आल्या. एका अर्थाने हे एक प्रकारचे कॉन्स्ट्रेंशन कॅम्पसच होते.

हा काळा कायदा मांडत असताना त्या वेळच्या कायदा व सुव्यवस्था समितीचे सदस्य जे.व्ही. स्टीफनस् यांनी सदर वील मांडताना त्यांनी जे भाषण केले (१८७१ - क्रिमीनल ट्राईव्ज ॲक्ट ) ते महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणाले, "समाजातील जाती व्यवस्था हा भारताचा एक विशेष भाग आहे. जातींनीच व्यवसाय ठरवले जातात अशी येथे स्थिती आहे. सुताराच्या कुटुंबातील व्यक्ती शतकानुशतके सुतारच होईल. तर भंग्याच्या कुटुंबातील व्यक्ती शतकानुशतके भंगीच राहील हे लक्षात घेतले तर "जातिवंत गुन्हेगार" या संज्ञेचा अर्थ स्पष्ट होतो. त्याचा सरळ अर्थ असा, ही अशी जमात आहे की, ज्यांचे पूर्वज अनादी काळापासून गुन्हेगार होते, ज्या जमातीतील लोक स्वत: जातीचा व्यवसाय म्हणून गुन्हेगारी करतात आणि त्यांचे वंशजही स्वत:च्या जात धंद्याला अनुसरून कायद्याचे उल्लंघन करून गुन्हे करीत राहणार आहेत. त्यांची ही अवस्था त्यांचे ठगाप्रमाणे समूळ उच्चाटन केल्याशिवाय बदलू शकणार नाही. जेव्हा या जमातीतील व्यक्ती असे कवूल करते की, कायद्यासमोर तो गुन्हेगार आहे तेव्हा त्याचा अर्थ असा की, गुन्हेगारी त्यांचा व्यवसाय आहे. त्यांच्या जन्मापासून आहे आणि तो त्यांच्या अंतकाळापर्यंत तसाच राहणारा आहे. त्यांच्यात सुधारणा होणे अशक्य आहे. कारण गुन्हेगारी हा त्यांच्या जातींचा धंदा आहे. एवढेच नाही तर गुन्हा करणे हा त्यांचा धर्म

आहे. या कायद्याने अनेकं गोष्टी गृहित धरलेल्या आहेत. उदा. या जातीतील मूल जन्मत:च गुन्हेगार होते कारण ते लहानपणापासूनच गुन्हेगारी करत फिरते. एकदा गुन्हेगारी करण्याचे कौशल्य मिळवले की हेच आपल्या उपजिविकेचे साधन आहे, असे ते मानु लागते आणि गुन्हेगारी हा त्याचा व्यवसाय बनतो."[१८]

सतत गुन्हेगारी कृत्य करत राहिल्याने व्यक्ती अट्ठल गुन्हेगार बनतात नंतर त्यांना सुधारणे कठिण जाते काही वेळेला तर केवळ अशक्य असते. अशा व्यक्तिंचा समुह म्हणजे गुन्हेगार जमात होय. अशा प्रकारच्या अनेक गुन्हेगार जमाती या क्रिमीनल ट्राईब्ज ॲक्ट मध्ये अंतर्भूत केल्या होत्या. परिणामी कायद्याच्या कलम ३ नुसार सर्व प्रांतामधील जिल्हा अधिकाऱ्यांना आदेश रवाना करण्यात आले की, त्या परिसरामध्ये असणाऱ्या गुन्हेगार जमातीची यादी निश्चित करा. या आदेशामुळे असे झाले की, डाका पडला, दरोडा पडला, चोरी झाली की लगेच या भटकणाऱ्यांची पाले धुंडाळण्यास सुरूवात झाली. कोणताही पुरावा नसताना 'जात' आधार मानून त्यांना छळण्यास सुरूवात झाली. जे जे भटके ते ते गुन्हेगार असे समीकरण मांडण्यात येऊ लागले. भटक्या जमातींना हजेरी पद्धत लागू केली. रात्री ११ वाजता व पहाटे ३ वाजता त्यांना हजेरी द्यावी लागे. जनावराप्रमाणे गाव सोडताना व नवीन गावात प्रवेश करताना दाखला देण्याची व घेण्याची पद्धत भटक्या जमातींना लागू केली. तीन दिवसांपेक्षा जास्त कोठे त्यांना राहता येत नव्हते. हळू-हळू भटकणाऱ्यांनाही या भटकण्याची आणि अशा पद्धतीची सवय होत गेली. अशा पद्धतीमुळे एका अर्थाने त्यांचा स्थिर जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतला होता. पुढे-पुढे तर हीच त्यांची संस्कृती बनली. आता तर स्थिर राहणेच त्यांना अधर्माचे वाटू लागले. त्यांना अनेक प्रकारच्या वाईट प्रथा जडल्या गेल्या. त्यांच्यामध्ये अंधश्रद्धेचा थयथयाट सुरू झाला. समाजात अपमानित राहणे किंवा त्यांचा स्वाभिमान दुखावणे यात गैर वाटेनासे झाले. सवर्ण समाजाचा त्यांच्याबद्दल असलेला दृष्टिकोन हळूहळू नकारात्मक होऊन ते त्या त्यांना दूर ठेवू लागला. त्यांची पत संपुष्टात आली. त्यांच्या मधील मन:शाती व स्थैर्य संपुन त्यांना काही काम किंवा रोजगार मिळण्याची शक्यता संपली. त्याचबरोबर त्यांचे पारंपरिक व्यवसायही सुटुन पोलिसांकडून होणाऱ्या छळात

प्रचंड वाढ झाली. संशयावरून त्यांना अटक होऊ लागली. त्याचे व्यक्तीगत जीवनच नष्ट झाले. गुन्हा कबुलीसाठी त्यांच्यावर अघोरी उपाय सुरू झाले. साहजिकच त्यातून पुढे गुन्हे कबुल करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. जीवन निर्वाहाचे साधन नसल्यामुळे गुन्हे करणे किंवा भीक मागणे या शिवाय त्यांच्यासमारे दुसरा कोणताच पर्याय उरला नाही.

"भारतात सर्व कामे जात धर्म बघून केली जातात कारण तिथे जातीचे प्राबल्य आहे. म्हणून जात धर्माने ठरते. व्यक्तीचे सर्व जीवन जात नियंत्रीत करते म्हणून जात-गाव, जात-धंदा जातीनेच ठरतो. म्हणून गुन्हेगार पूर्वजांचे वंशजही गुन्हेगारच असणार अशा अनैसर्गिक व अशास्त्रीय आधारावर कायदा करण्यात आला. परिणामी भटक्या लोकांचे समूहाच्या समूह हे गुन्हेगार टोळ्या म्हणून ठरवण्यात आल्या. त्यांच्या वेगळ्या सेटलमेंट्स कॉलनीज तयार करण्यात आल्या. अशी ५२ सेटलमेंट्स तर एकट्या मुंबई इलाख्यात होती. या गुन्हेगारांना तीन तारांच्या कंपौडमध्ये अडकवून ठेवण्यात आले होते."[१९]

## १.१.१३ भटक्या जमातींतील गुन्ह्यांचे विशिष्ट प्रकार :

"गुन्हेगार जमातीतील विशिष्ट जमाती विशिष्ट प्रकारचे गुन्हे करीत. उदा. पूर्वीच्या मध्य प्रांतातील (विद्यमान महाराष्ट्रातील भंडारा, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर जिल्हे आणि मध्यप्रदेशातील महाकोशल सारखे भाग) गोपाळ आणि मारवाडी, केजार या जमाती फक्त गुरांचीच चोरी करत असत. कोरवा जमातीत घर फोडी आणि चोरी करणे भ्याडपणाचे कृत्य मानतात. गुन्हे केव्हा आणि कोठे करावयाचे याचे संकेत असत. पंजाबमधील टॅगू हे रात्रीच्या वेळी गुन्हे करीत नसत. भामटे ज्या खेड्यात रहात तेथे चोरी करीत नसत. पूर्वीच्या संयुक्त प्रांतातील (विद्यमान उत्तर प्रदेशातील) सोनारहिया हे आपल्या घराजवळ कधीही चोरी करत नसत. वर्तणुकीचे नियम आणि नैतिकता ते काटेकोरपणे पाळीत असत. गुन्हेगार जमाती या दूर जंगलात वास्तव्य करतात. त्यांच्याजवळ उपजीविकेची साधने नव्हती म्हणून गावगाड्यात त्यांना स्थान मिळाले नाही. अपवाद लमाण, वंजारा, वडार इ. जमाती."[२०]

## १.१.१४ ब्रिटिश कालीन अवस्था व १८७१ सालचा क्रिमिनल ट्राईब ॲक्ट :

भारतात जेव्हा ब्रिटिश अमदानी सुरू झाली तेव्हा भारतीय समाजात अराजकता होती.

कारण ब्रिटिशांना सर्व भाग एकदम कावूत घेता आला नव्हता. देशातील या सामाजिक व राजकीय अस्थैर्याचा फायदा तत्कालीन गुंडांनी, दरोडेखोरांनी घेतला. लूटालूट, दरोडेखोरी, अनाचार, अत्याचार आणि गरिबांना दुष्कर्माला लावून स्वत: नामानिराळे राहण्याचा उद्योग त्यांनी आणि तथाकथित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुरू केला. वसुलीच्या नावाखाली जमिनदारांचे शेतमजुरांवर, भुमिहिनांवर, कामगारांवर अत्याचार सुरू झाले. अशा विचित्र कोंडीत गरीव व भटकत कसावसा चरितार्थ चालविणारे लोक अडकले गेले. गुन्ह्यावावत या लोकांना कोणत्याही पूरावाचा आधार न घेता त्यांना शिक्षा होऊ लागली. तेव्हा गुन्हेगार असा एकदा कपाळी वसलेला शिक्का पुढच्या पिढीवरही वसला. या भटकणाऱ्या लोकांचाच गुन्हेगारीचा व्यवसाय असतो असा समज होऊन त्यांच्यावर अनन्वित अत्याचार सुरू झाले. याचा परिणाम असा झाला की या सर्व जमाती 'गुन्हेगारी जमाती' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. एवढेच नव्हे तर इ.स. १८७१ मध्ये व्रिटिश सरकारने या जमातीवावत 'गुन्हेगार जमाती कायदा' (क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट) संमत करून त्यावर कळस चढविला. त्या पिढीतील अगर पुढच्या पिढीतील व्यक्ती कितीही चांगली असो, प्रामाणिकपणे आपले पोट भरीत असो ती गुन्हेगार जमातीची व्यक्ती म्हणून ओळखली जाऊ लागली.

एक प्रकारे माणूस म्हणून जगण्याचे या जमातींचे जणू हक्कच हिरावून घेतले गेले. त्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्या वरोवरच सार्वजनिक जीवनापासूनही वंचित करण्यात आले. त्यामुळे या जमातींना सतंत अन्यायालाच सामोरे जावे लागले. साहजिक या समाजाचा फार मोठा वर्ग बराच काळ उपेक्षित, मागासलेला आणि असंघटित राहिला. आजही अगदी खेड्यापाड्यातून असेच प्रकार जाणवतात.

"समाजात एकीकडे छळ सुरू असतानाच कायदेशीर वंधन थोडे कमी करण्यात आले. गुन्हेगार जमातींच्या मुलांना शिक्षण मिळून त्यांच्यावर संस्कार व्हावेत म्हणून इ.स.१८९० मध्ये कायद्यात दुरूस्ती करण्यात आली. या कायद्यानुसार या जमातींच्या मुलांना आई-वडिलांपासून दूर ठेवून त्यांना शिक्षण द्यावे हा विचार पुढे आला. इ.स.१९१९ मध्ये 'ऑल इंडिया जेल कमिटी' ने गुन्हेगार जमातीचे पुनर्वसन व्हावे अशी शिफारस केली. तर इ.स. १९२४ मध्ये

त्यांचे 'सेटलमेंट सेंटर' संपूर्ण भारतात सुरू करावे अशीही सूचना मांडली गेली. त्यानुसार १.लहान मुलांची आई-वडिलांपासून दूर शिक्षणाची सोय २. नवीन औद्योगिक वसाहतींची निर्मिती ३.कसण्यासाठी जमिनीची उपलब्धता ४.अकुशल कामगार म्हणून या जमातीमधील लोकांची सोय अशा काही सुविधांची तरतुद करण्यात आली होती. परंतु हे सर्व कागदावरच राहिले. समाज माणसात असलेली या जमाती विषयीची प्रतिमा तीच होती."[२१]

## १.१.१५ भटक्या जमातींची स्वातंत्र्यानंतरची स्थिती:

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र मानले जाऊ लागले याचा योग्य तोच परिणाम झाला. इ.स.१९५२ मध्ये गुन्हेगार जमातीचा कायदा रद्द करण्यात आला. हा कायदा रद्द केल्याने या जमातींवरील निदान कायद्याचे तरी जोखड दूर झाले. जेंव्हा हा कायदा रद्द करण्यात आला तेंव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कायदामंत्री होते. त्यांच्या पुढाकारामुळे या कायद्याचे रूपांतर 'हॅब्युचल ॲक्ट' मध्ये झाले आणि या जमाती 'एक्स क्रिमिनल ट्राईब्ज' किंवा 'भटक्या विमुक्त जमाती' म्हणून जाहिर झाल्या व त्याच नावाने त्या भारतात ओळखल्या जाऊ लागल्या. या ९१ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर गुन्हेगार म्हणून या जमातींच्या कपाळी बसलेला शिक्का कायदेशीर रित्या पुसला गेला.

## १.१.१६ भटक्या जमातींच्या चळवळीचा प्रारंभ:

गुन्हेगार जमात कायदा हा इ.स.१९५२ साली रद्द झाला आणि पुनर्वसनासाठी कायदेशीर तरतूदी ही केल्या गेल्या असल्या तरी त्यांच्या चळवळीचा खरा पाया प्रामुख्याने गेल्या दोन दशकातच घातला गेला. आणि भरीव स्वरूपात कार्याला सुरूवात झाली. सोलापूर येथे पहिले 'अखिल भारतीय विमुक्त जमाती फेडरेशनचे अधिवेशन' इ.स.१९६० साली भरले. यावेळी दोन लाख लोक जमले होते. यावरून पुनर्वसनासाठी त्यांची चालेलेली धडपड किंवा तीव्र इच्छा यातून दिसून येते.

अधिवेशनाचे उद्घाटक हे पं.जवाहरलाल नेहरू होते. या अधिवेशनामुळे विमुक्त जमातींच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली. याचा परिणाम

स्वरूप म्हणून इ.स.१९६१ मध्ये विमुक्त जमातींना चार टक्के राखीव जागांची मान्यता दिली गेली. पण तसे पाहिल्यास एकूण भटक्या जाती-जमातींच्या लोकसंख्येच्या मानाने ही किती तुटपुंजी व्यवस्था होती हे पुढे सुस्पष्ट झाले. कार्यकर्ते अधिक संघटित होऊन अन्यायांना वाचा फोडण्यास सुरूवात झाली. महाराष्ट्रामध्ये तर अनेक ठिकाणी मेळावे, परिषदा घेण्यात आल्या. प्रचंड लोकशक्तीचे आणि कार्यकर्त्यांच्या धडाडीचे दर्शन या काळात झाले.

वदलत्या काळानुसार व गरजेनुसार चळवळीला वेगवेगळे नेतृत्व मिळत गेले. इ.स.१९७२ मध्ये या जमातींची मुंवईहून परिषद भरून इ.स.१९७४ मध्ये विधानसभेवर मोर्चा नेऊन शासनापुढे त्यांनी आपल्या मागण्या मांडल्या. न्याय हक्कांसाठी आग्रह धरला. फेब्रुवारी १९७३ मध्ये झालेल्या औरंगावादमधील 'गुन्हेगार जमाती अत्याचार निर्मूलन' परिषदेमध्ये अनेकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिज्ञा घेतली की, "आम्ही जन्मत: चोर किंवा भिकारी नाही. आम्ही चोर-भिकारी वनू इच्छित नाही. स्वकष्टावर आधारीत असे स्वावलंवी व स्वाभिमानी जीवन जगू इच्छितो."[२२] या परिषदेतून पारंपरिक झोळी व पोलीसांची हथवेडी यांच्या प्रतिमांचे दहन करण्यात आले. एक ऐतिहासिकदृष्टया महत्त्वपूर्ण म्हणून हा प्रसंग खूपच गाजला होता. या प्रयत्नांची परिणती अशी झाली की, महाराष्ट्रात वसंतराव नाईक यांनी 'विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ' स्थापन केले. आजच्या परिस्थितीत या चळवळीने भारतात मूळ धरले आहे. आपल्याला योग्य तो न्याय मिळावा, किमान सर्व सामान्य जीवन जगण्याची संधी उपलव्ध व्हावी आणि समाजामध्ये सामाजिक, आर्थिक दर्जा इतरांसारखा आपणालाही मिळावा अशा स्वरूपाच्या या जमातींच्या शासनाकडे मागण्या असून त्यातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

"१. सर्वप्रथम भटक्या विमुक्त जमातींची जगगणना विशेष काळजीपूर्वक व्हावी. जनगनणेसाठी फिरते पथक नेमून घटनेच्या ३४० कलमानुसार ती पाहणी करावी.

२. राजकारणात सर्वत्र या जमातींच्या प्रतिनिधींना स्थान देण्यात यावे. म्हणजे त्यांचे प्रश्न शासनाला व समाजाला कळतील ते सोडविण्यासाठी प्रयत्न होतील.

३. या जाती-जमातींची माहिती विशिष्ट अभ्यासगट निर्माण करून प्रसिद्ध करावी.

४. देशात हजारो एकर पडून असलेली जमीन या जमातींच्या लोकांना देऊन त्या जागीच त्यांचे पुनर्वसन करावे.

५. अनुसूचित जाती-जमातींप्रमाणेच या जातींच्या कल्याण कार्यक्रमासाठी आर्थिक योजनेची तरतूद असावी व त्यांची योग्य ती कारवाई केली जावी.

६. काही जमातींकडे व्यावसायिक कौशल्य आहे. त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन बाजारपेठ उपलब्ध केली जावी.

७. पाश्चात्य देशात भटक्या जमातींचे पुनर्वसन झाले, त्याचा अभ्यास करून योग्य ते उपाय योजावेत.

८. शरीराने काटक असणाऱ्या जमातींच्या लोकांना सैन्यात भरती करून घेऊन नोकरीची संधी द्यावी.

९. प्रौढ शिक्षणाचा फायदा याही जमातींच्या लोकांना द्यावा.

१०. भटक्या जमातींच्या पुनर्वसनाचे केंद्र इतर समाजाशेजारीच असावे म्हणजे नागरी जीवनाशी त्यांचाही संपर्क येईल. त्यासंबंधी योग्य ती कायदेशीर तरतूद असावी.

११. भटक्या जमातींच्या लोकांना कायम निवासाची सोय व्हावी. कारण हे लोक एकाच ठिकाणी राहत नसल्याने त्यांना बँकेचा कर्जपुरवठा व शासनाच्या निवासपद्धतीचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे ते रोजगारही मिळवू शकत नाहीत. त्यामुळे शासानातर्फेच ही व्यवस्था व्हावी.

१२. या जमातींना सर्व प्रकारचे कायद्याचे सरंक्षण दिले जावे." [२३]

अनेक दशके अंधारात खितपत, गांजत पडलेला भटका समाज आज जागृत झाला आहे. आपल्यावरील अन्यायांची दाद मागण्याचे धाडस त्यांच्यामध्ये निर्माण झाले आहे. स्थिर जीवन जगण्याची व समान संधी मिळण्याची ईर्षा समाजमनात उत्पन्न झाली असून त्यासाठी हा समाज कार्यप्रवणही झाला आहे. तसेच त्याची अस्मिता, त्याचा अभिमान जागृत होऊन, शोषणाविरूद्ध त्याने आंदोलन उभारले आहे. एक सुस्थिर, शांतपणाचे मानवी जीवन जगणे हे त्याचे स्वप्न असलेले दिसून येते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

भारतामध्ये इतर प्रांतापेक्षा भटक्या जाती जमातींचे प्रमाण जास्त असून महाराष्ट्रात एकूण ४२ विमुक्त जमाती आहेत. त्यापैकी २८ भटक्या व १४ विमुक्त आहेत. या ४२ जमातींच्या पोटजातींची संख्या २०० पर्यंत आहे. यामध्ये संस्कृती, भाषा, व्यवसाय, भौगोलिक परिस्थिती यामध्ये वेगवेगळेपणा आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ६४ वर्षे होऊनही हे लोक अंधश्रद्धा, जुन्या अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, विवाह पद्धती, सण, उत्सव व राहणीमान यावर विश्वास ठेवतात. यामध्ये शिकार करून उपजीविका करणारे, जनावरे पाळून खरेदी-विक्री करणारे, पारंपरिक कलेच्या आधारे लोकांचे मनोरंजन करून जगणारे, हस्तरेषा भविष्य सांगणारे, देवाच्या नावावर भिक्षुकी करणारे, घरोघरी भिक्षा मागून जगणारे, धार्मिक विधी कार्ये करणारे आणि कष्टाची कामे करून उपजीविका करणाऱ्या भटक्या विमुक्त जमातींचा समावेश आहे. शतकानुशतके दुर्बल असणाऱ्या गुन्हेगार ठरलेल्या शोषित व दुर्लक्षित अशा भटक्या विमुक्त जाती-जमातींची जीवनपद्धती बहुसंख्य जनतेला अजूनही माहिती नाही. हा समाजही आता प्रस्थापित समाजाप्रमाणे जीवन जगण्यासाठी पुढे येऊ पहात आहे. जागृत होत आहे. त्यांच्यात परिवर्तन व्हावे म्हणून झटत आहे. तेव्हा भटक्या विमुक्त जमाती या देशाच्या संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून त्यांना कायमचेच दूर लोटले आहे. तरी देखील गावाबाहेर राहूनही या समाजाने आपली संस्कृती टिकवली आहे. अंधश्रद्धा, पारंपरिक रूढी, जात पंचायत, जत्रेत बकऱ्यांना बळी देणे, पोटासाठी अंगावर चाबकाचे फटकारे मारून समाजाला खेळ दाखविणे, बालविवाह, मुलींची विक्री या अघोरी कृत्यांचा तपशिल पाहिला तर भटक्यांचे जग हे अंधारमय आहे.

अशाप्रकारे यापूर्वी गुन्हेगारी जमात म्हणून ओळखला जाणारा आणि सद्य परिस्थितीत विमुक्त जमात म्हणून असलेला उपेक्षित वेरड समुदायाची समाजाला माहिती होणे आवश्यक आहे. त्यांच्या सद्यपरिस्थितीमध्ये बदल होत चाललेला आहे याची जाणिव समाजाला करून देणे आवश्यक आहे. याच उद्देशाने या विमुक्त जमातीतील 'वेरड जमात' हिचा अभ्यास करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

## १.१.१७ भटक्या जमातीच्या पुर्नवसनाचे प्रयत्न :

या अमानवी, अनैसर्गिक काळया कायद्याच्या विरोधी काही तज्ज्ञ संवेदनशील मंडळीनी त्या काळामध्ये गुन्हेगार जमातींच्या परिषदा घेतल्या होत्या. 'तिन्नेवेल्ली' येथे पहिली गुन्हेगार जमातीची परिषद १४ मे १९३९ मध्ये भरली होती. त्यानंतर १० आक्टोंबर १९३९ रोजी बिहारचे त्यावेळचे गव्हर्नर एम.एस.अने यांनी अखिल भारतीय गुन्हेगार जाती-जमातींच्या परिषदेच्या अध्यक्ष पदावरून बोलताना पुढील उद्‌गार काढले होते.

"खूप विचारांती आम्ही एखादी संपूर्ण जमात त्याच्यातील काही लोकांच्या चुकांमुळे गुन्हेगार म्हणून जाहिर करण्यास व त्यातील सदस्यांची नोंदणी करण्यास विरोध केला. केवळ त्यांचेवरील संशयावरून त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने आणणाऱ्या जाचक अमानवी बंधनांवर आक्षेप घेतले, आम्हाला गुन्हेगार जमातींच्या कायद्यातील कलम २३ ला कडवा विरोध करणे हे आवश्यक वाटले, कारण त्यातील अमानुषतेमुळे कठोर व सराईत गुन्हेगारच निर्माण होतील. सदर कायद्याला प्रारंभी काही महत्त्व असले व त्यात काही तथ्य असले तरी तो आता निर्विवादपणे कालबाह्य झाला आहे."[२४]

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू हे आरंभापासूनच या कायद्याच्या विरोधी होते. आंध्रप्रदेशातील नेल्लोर येथे १८ ऑक्टोवर १९३६ रोजी केलेल्या भाषणात त्यांनी पुढील उद्‌गार काढले.

"I am aware of monstrous provision of the criminal Tribes Act, Which constituted negation of civil liberty wide publicity should be given to its working and an attempt made to have the Act removed from the statute book. No tribes could be classed as criminal as such and the whole principle is out of consonance with all civilized principles of criminal justice and treatment it offers."[२५]

व्ही.राघवय्या यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या भारतभरच्या या कायद्याविरूद्धच्या संघर्षाने जवाहरलालजी समाधानी झाले होते. हे अशा स्वरूपाचा संघर्ष किंवा प्रयत्न महाराष्ट्राबाहेर चालू असतानाच काही प्रयत्न महाराष्ट्रामध्येही झाल्याचे दिसते. सामाजिक

परिवर्तनाच्या चळवळीचे आधारस्तंभ महात्मा ज्योतीराव फुले यांनी त्यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये या जमातींची दखल घेतली आहे. महर्षी विठ्ठलरामजी शिंदे यांनी तर या जमातीमध्ये प्रत्यक्ष काम करून त्यांच्या एकंदर परिस्थितीवर विपुल असे लिखाण केले आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी तर आपल्या खाजगी बंदोबस्तकरिता पारध्यांच्या सारख्या बदनाम असलेल्या जमातीकडे संरक्षणाची पदे देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला होता. आजही कित्येक पारध्यांकडे त्यांनी दिलेले बिल्ले, किताब, शिकारीचे परवाने पहायला मिळतात तर शिकारीसाठी माकडवाला बैदु या जमातींना महाराजांनी महाराष्ट्रात आणल्याचे आजही या जमातीतील लोक सांगतात.

महाराष्ट्रातील मुंबई सरकारने १९३८ मध्ये काही जातींना या कायद्याच्या जोखडातून मुक्त केले. १९४२ मध्ये त्यात दुरूस्ती करून कलम २३ मधील 'Transpratation of Life' ची तरतूद रद्द केली व त्यातील शिक्षेचे स्वरूप सौम्य केले.

अखेर १८७१ साली सुरू झालेला गुन्हेगार जमाती संबंधीचा अशास्त्रीय आधारावर आधारलेला क्रूर कायदा संसदेने १९५२ साली रद्द करून गुन्हेगार जाती-जमातींना विमुक्त म्हणून घोषीत करण्यात आले. त्यांच्यावर घातलेली बंधने रद्द झाली. एखाद्या विशिष्ट जाती जमातीतील व्यक्ती जन्माने गुन्हेगार असतात हे अशास्त्रीय तत्त्व नाकारले गेले असले तरी ८१ वर्ष हा कायदा अस्तित्वात होता. याचा परिणाम म्हणजे तीन पिढ्या समाजमानसात या जाती-जमातींकडे ते गुन्हेगार म्हणून पाहिले गेले. साहजिकच समाजाचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला नाही. तेव्हा त्यांच्यातील दूरावा कायम राहिला तो घालविण्याचा प्रयत्न कुणीही केला नाही.

या भटक्या जाती-विमुक्त झाल्या असल्या तरी आजही त्यांच्याबद्दलचा अविश्वासच कायम आहे. कुठेही गुन्हा झाला तरी पहिले संशयीत म्हणून यांनाच धारेवर धरले जाते. त्यांचा छळ केला जातो. जवळ-जवळ दिडशे वर्ष या जमातींकडे शासनाने आणि समाजाने गुन्हेगार म्हणून पाहिले, वागविले त्यामुळे साहजिकच या जमातींनी स्वत:ची वेगळी अशी यंत्रणा उभारली. जगण्याचे नियम तयार करून न्याय पंचायतीची स्वतंत्र व्यवस्था केली. आपल्या

जमातीच्या संरक्षणासाठी गुप्त भाषा केली. जातगावे पद्धत अस्तित्वात आणली. आजही भटक्या विमुक्तांनी आपली स्वतंत्र संस्कृती जतन केल्याचे दिसते. भाषा, वेश-भूषा, भोजन, गायन, वेगवेगळ्या कला, क्रिडा, संगीत अशा अनेक बाबी त्यांच्या आदीम संस्कृतीच्या खुणा म्हणून त्यांनी जोपासल्याचे दिसून येते. परंतु त्यांचाही अभ्यास अद्यापपर्यंत झाला नाही. आणि तो होणे अत्यंत गरजेचे आहे कारण जेव्हा व्यापक समाजाने त्यांना व त्यांनी व्यापक समाजाला समजावून घेतले तर दोघांच्यातल्या दुराव्याची दरी कमी करता येईल आणि भटक्या विमुक्तांचा अलग पडलेला सांस्कृतिक प्रवाह मुख्य प्रवाहात विलीन होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने भटक्या विमुक्तांचे प्रश्न सुटू शकतील अन्यथा ते सुटू शकणार नाहीत.

"१८७१ च्या क्रिमिनल ॲक्टने या कायद्यात सुधारणा करून गुन्हेगार जमातींची सेटलमेंट्स तयार केली होती. तीन तारांच्या कंपाऊडमध्ये त्यांच्या वसाहती होत्या. या वसाहतीमध्ये यांच्या पुर्नवसनाचा प्रयोगच चालू होता. त्यांनी या वसाहतीमध्ये सक्तीचे मोफत शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या होत्या. या शाळा पुन्हा हेतुत: धंदेशिक्षण शाळा या स्वरूपात चालू होत्या. या शाळामध्ये मुलांना, प्रौढ माणसांना तांत्रिक शिक्षण दिले जाई. त्यामध्ये प्रोसेसिंग, कारपेंटरी, टेलरिंग या स्वरूपाचे शिक्षण होते. उदा.सोलापूर हे हिंदुस्थानातील सर्वात मोठे सेटलमेंट होय. ब्रिटिश सरकारने या जमातींच्या पुर्नवसनासाठी शेकडो एकर जमिनी राखून ठेवल्या होत्या असे आज दिसते. सोलापूर ४८० एकर मुंढवा सेटलमेंट पुणे २३५एकर, बारामती सेटलमेंट २५० एकर असे अनेक ठिकाणी म्हणजे जवळपास ५२ ठिकाणच्या वसाहतींमध्ये त्यांना वरील प्रकारचे शिक्षण देण्यात येत होते. सोलापूरचे वैशिष्ट्य असे की, तेथील सेटलमेंट मध्ये वस्त्रोद्योगात लागणारे तांत्रिक शिक्षण दिले जाई व शिक्षण घेतलेल्या माणसाला शासनाच्या लक्ष्मी मिलमध्ये लगेच नोकरीला ठेवले जाई. अशा नोकरीला लागलेल्या माणसांची वेगळी वसाहत होई. अशा वसाहतीला फ्री कॉलनी म्हणत असत."[२६]

सेटलमेंट तारांच्या उघड्या तुरूंगात चालवले जाणारे तीन तारांचे कॉन्सनट्रेशन कॅम्पस अखेर १९५२ साली भारत सरकारने १८७१ सालचा गुन्हेगार कायदा रद्द ठरवून केले.

१९५३ साली मागास वर्गीयांच्या अभ्यासासाठी शासनाने नेमलेल्या काकासाहेब कालेलकर आयोगाचा अहवाल १९५५ साली लोकसभेपुढे ठेवण्यात आला. या आयोगाने अतिमागासलेले ठरवलेले जात-जमात समुह १९६0 साली पुन्हा वेगवेगळ्या परिशिष्टामध्ये घातले गेले. उदा. बंगालमधल्या गुन्हेगार जमाती अनुसूचित जमातीमध्ये घातल्या तर कर्नाटकात या गुन्हेगार जमाती अनुसूचित जाती व जमातीत घातल्या. तामिळनाडूमध्ये या जमाती आदिवासी मानण्यात आल्या. तर महाराष्ट्रात या जमातींची तिसरी यादी तयार करून त्यांना डिनोटीफाईड कम्युनिटीज्, एक्सक्रिमीनल ट्राईब्ज, विमुक्त जाती, भटक्या जाती या नावाने घोषित करून राज्य शासनाने त्यांना सवलतीस पात्र केले. त्यातही पुन्हा एकाच जमातीला वेगवेगळ्या यादीत एकाच प्रांतात घातले आहे. उदा.तामिळनाडूमध्ये कुरवंजी व कुळव, केरळात कुखंजी, ओरीसा व आंध्रमध्ये येरकुला व पामलोर, कर्नाटकात कोखा, कोरचा, कोरमा, कोरवॉर, कुंची कोरवा, महाराष्ट्रात कैकाडी अशा असंख्य नावाने ओळखला जाणारा हा समाज रोटी-बेटी व्यवहाराने जमात पंचायतीने एकसंघ बांधलेला आहे. पण शासनाने तयार केलेल्या याद्यांमध्ये मात्र तो विखूरलेला आहे. महाराष्ट्रात तो विदर्भात अनुसूचित जातीत आहे. तर विदर्भ सोडता उरलेल्या महाराष्ट्रात तो विमुक्त जमातीत आहे. हीच गोष्ट बंजारा, वाघरी, कैकाडी, गोंधळी, जोशी, भराडी यांची आहे असे आपणास दिसेल. वस्तूत: नोमॅडिक किंवा भटक्या जमातींची वेगळी यादी तयार व्हायला हवी होती ती झाली नाही. तसे पाहिले तर या जमातींना इंग्रजीमध्ये नोमॅडिक ट्राईब्ज म्हणून शासनानेच मान्य केले आहे. मग भारतीय पातळीवर यांना अनुसूचीत जमातींच्या यादीत का घातले नाही? हा प्रश्न येथे निर्माण होतो. उलट या गुन्हेगारी व शिक्षाकरी वृत्तीने शापीत असलेल्या कायद्याने या लोकांची जबाबदारी राज्य शासनावर टाकून केंद्राने आपले हात झटकून टाकले आहेत. वस्तूत: हा कायदा केंद्राचा होता. मग केंद्राने त्यांच्या पूर्नवसनासाठी कायदा करून जबाबदारी घेण्याचे का टाळले आहे? असा प्रश्न निर्माण होतो.

१९६0 साली जेव्हा सोलापूर येथे तारा तोडण्याचा फार मोठा समारंभ झाला तेव्हा या समारंभाला देशातील गुन्हेगार जमातीतील लक्षावधी लोक हजर होते. या लोकांच्या समोर

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यांच्या तारा तोडल्या आणि यांना मुक्त करून टाकले. या समारंभाला जवाहरलालजी अध्यक्ष होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण, तपासे साहेब आणि या समारंभाला असे कितीतरी लोक हजर होते. या समारंभात नेहरू म्हणाले, "जन्माने माणूस गुन्हेगार असतो ही कल्पनाच मुळी जंगलीपणाची आहे. परंतु गेली १00 वर्षे आपण हा काळा कायदा सोसला. देश स्वतंत्र झाला, आता आपण सारे मुक्त झालो. पण तुम्ही दुहेरी जाचातून मुक्त झालात. म्हणून आपण आता विशेष विमुक्त आहात. या कायद्याने गुन्हेगार ठरवलेल्या १९८ जमातींचे लोक आता मुक्त आहेत. आपण मुक्त झालात. आपल्या तारांच्या वेड्या तुटल्या आणि त्या माझ्या पायात पडल्या आहेत. आपलं पुर्नवसन करण्याची कायदेशीर व नैतिक जबावदारी मी स्विकारतो आहे." [२७]

वस्तुत: राज्य घटनेतील ४६ व्या कलमानुसार अनुसूचित जाती-जमातीचे आणि समाजातील इतर दुर्वल व मागास समाज घटकांचे, सर्व प्रकारच्या शोषणापासून व सामाजिक अन्यायापासून रक्षण करण्याची तसेच त्यांच्या आर्थिक व शैक्षणिक ह्वितसंवंधाची विशेष काळजी घेऊन जोपसना करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. घटनेतील हे एक मार्गदर्शक तत्त्व आहे. या तत्त्वाला अनुसरून अनुसूचित जाती-जमाती व्यतिरिक्त त्यांच्याहूनही निकृष्ट समाज घटक म्हणून भटक्या विमुक्त जमातींचा स्पष्ट उल्लेख वरील कलम ४६ च्या प्रथम भागातच केलेला आहे. तरीपण भटक्या विमुक्तांना आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात काही किमान सवलती मिळण्यावावत घटनांतर्गत संरक्षण मात्र देण्यात आलेले नाही. यानंतर अनेकदा घटना दुरूस्त्या झाल्या. परंतु या जमातींना मात्र न्याय मिळाला नाही. एकदा वनलेल्या परिशिष्टातील याद्या पोलादी चौकटी ठोकून वंद करण्यात आल्या आणि आज जे याद्यात समाविष्ट नाहीत ते आदिवासीपेक्षा निकृष्ट असूनही, अनुसूचित जातीपेक्षा निकृष्ट असूनही या याद्यांना वंचित आहेत.

मागासवर्गीयाचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने १९६५ मध्ये नियुक्त केलेल्या लोकूर समितीने भटक्या विमुक्तांवर काही प्रमाणात प्रकाश टाकला आहे. लोकुर समिती

आपल्या अहवालाच्या परिच्छेद क्र.२९ मध्ये म्हणते. "गेल्या १५ वर्षाच्या काळात भटक्या विमुक्त जमातींच्या बावतीत जो विशेष विस्ताराने अभ्यास व्हायला पाहिजे होता तो झालेला नाही असे आम्हास दिसून आलेले आहे. भटक्या विमुक्तांच्या समस्या समजून घेण्यासाठी पुरेशी माहिती व पुरेसा वेळ नसल्यामुळे त्यांच्या यादीवर गुणानुक्रमानुसार आम्ही निर्णय घेण्याच्या अवस्थेत नाही. त्यांना आहे त्याच अवस्थेत ठेवण्यापलिकडे आमच्या जवळ दुसरा पर्याय नाही."[२१]

या भटक्या जाती जमातींच्या व्यथा, वेदनेला वाचा फोडण्याचे प्रयत्न चालू आहेत. गेल्या काही वर्षात या प्रश्नासंवंधी या जमातीत जागृती होऊ लागली आहे आणि गेली १0 ते १५ वर्षे तर महाराष्ट्रात दलित म्हणजे नुसते महार, मांग आदिवासी नाहीत तर भटके विमुक्त अठरापगड जाती-जमाती अशी व्याख्या होऊ लागली आहे. दखल घेण्यासाठी चळवळ आज भटक्या विमुक्त जमातींनी केली आहे. अन्यायाविरूद्ध आपला आवाज ते ऊठवू लागले आहेत. वेगवेगळया विषयांवर परिषदा, मेळावे, मोर्चे, धरणे अशा विविध मार्गाने ते आपले म्हणणे मांडू लागले आहेंत, समाजप्रवोधन करत आहेत. काही लेखकही या जमातींमधून लिहित आहेत, वोलत आहेत. विशेषत: व्रिटीश ऑफीसर जे.व्ही. स्टीफनसन्, गावगाडाकार अत्रे या स्वातंत्र्यपूर्व काळातील लेखकांप्रमाणेच डॉ.वावा आढाव, अण्णाभाऊ साठे, डॉ.प्रभाकर मांडे, शंकरराव खरात, मालतीवाई वेडेकर, डॉ.भिमराव गस्ती, डॉ.अनिल अवचट, व्यंकटेश माडगूळकर, प्रा.मोतीराज राठोड, वाळकृष्ण रेणके, विलास वाडेकर यासारख्या साहित्यिक, पत्रकार, विचारवंत मंडळींनी आवर्जून लिहिले आहे. काहींनी वैचारिक, काहींनी साहित्यिक स्वरूपात लेखन केले आहे. त्यामुळे समाज प्रवोधनाच्या चळवळीची दिशाही वदलते आहे. मध्यमवर्गीय समाजाची मोठी सहानुभूती यांच्या पाठीमागे क्रियाशीलपणे उभी रहाते आहे. या मंडळींना न्याय देण्यासंवंधी मतभेद कुठेच दिसत नाहीत परंतु प्रत्यक्षात काहीच होताना दिसत नाही. त्यामुळे भटक्या विमुक्तांच्या प्रश्नाचा वेगवेगवळा विचार करून त्यांचे प्रश्न ते सोडवतील असे म्हणून सुज्ञांनी दुर्लक्ष करून उपयोग नाही. या प्रश्नाच्या पाठीमागे न्याय, नीती, विवेक यांची शक्ती लावावी लागेल आणि त्यांच्या चळवळीही संघटित

कराव्या लागतील, समाजातील मान्यताप्राप्त असलेल्या तज्ज्ञ व्यक्तींनी आपले नैतिक सामर्थ्य या उपेक्षितामागे उभे केले पाहिजे.

## १.१.१८ संशोधनाची गरज किंवा आवश्यकता:

समकालीन महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातींच्या जीवनाची ओळख करून देणारे आणि त्यांच्यात होणाऱ्या परिवर्तनाचे अचूक आणि चिकित्सक संशोधन झाले पाहिजे असे मला वाटते.

देशात आजही अनेक दलित दुबळे समाज घटक आहेत आणि त्यांचे सर्व प्रश्न सुटलेले आहेत असे नाही. परंतु ते एका जागी स्थिरावलेल्या अवस्थेत तरी आहेत या एका बाबींमुळे त्यांना किमान कागदोपत्री कायद्याने जमिनी किंवा गुरेढोरे, घरे इतर मालमत्ता यांचे हक्क व नागरी हक्कही कमी अधिक प्रमाणात मिळाले आहेत. संघटित लढे देण्याची त्यांची ताकद वाढते आहे म्हणून ते देशाच्या सर्वसाधारण विकासाच्या प्रवाहात सामिल झालेले आहेत. निदान पक्षी त्या प्रवाहाच्या काठावर ते पोहचलेले आहेत. भटक्या विमुक्त जमातींचा बहुसंख्य समाज घटक मात्र आजही देशातील विकासाच्या प्रवाहापासून अलिप्त राहिलेला आहे. एकीकडे हा समाज घटक एकूण समाज व्यवस्थेला विचकून स्वत:च विकासाच्या प्रवाहापासून अलिप्त रहाण्याचा प्रयत्न करीत आहे. तर दुसरीकडे त्यांच्या प्रश्नाबाबत बहुजन समाज उदासिन आहे असे दिसत आहे. भटक्या विमुक्त जमातींचा समाज घटक, देशाच्या विकासाच्या प्रवाहात सामिल व्हायचा असेल तर तो शासन, विचारवंत, सामान्य जनता यांच्या चिंतनाचा विषय बनला पाहिजे. त्यासाठी खेड्यापाड्यातून व रानावनातून फिरणाऱ्या निरनिराळ्या भटक्या जमातीच्या टोळ्यांबरोबर राहून त्यांचे जीवन प्रत्यक्ष अनुभवून अभ्यासून त्यांच्यातील प्रौढ स्त्री-पुरूष यांच्या मुलाखती घेऊन, त्यांच्या जीवनाच्या सर्वांगाचे (सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक, राजकीय अंगाचा अभ्यास होऊन) वस्तुनिष्ठ चित्र समाजापुढे येणे आवश्यक आहे.

बेघराच्या, भूमिहिनांच्या किंवा दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या याद्या तयार करून त्यांच्या कल्याणाच्या काही योजना शासन राबवीत आहे. भटक्या विमुक्त जमातींच्या

कल्याणासाठी तर काही खास सोयी सवलती ठेवण्यात आल्या आहेत. या जमातींच्या विकासाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाचे धोरण पहाता तसे ते कल्याणकारी आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र या जमातींच्या तळातल्या लोकांना शासकीय कल्याणकारी धोरणांचा, योजनांचा लाभ होत असलेला दिसत नाही. म्हणून कल्याणकारी धोरणाला अनुसरून योजनांच्या निर्मितीमध्ये, योजनांच्या अंमलवजावणीसाठी निर्माण केलेल्या यंत्रणेमध्ये, योजनांच्या अंमलवजावणीच्या पद्धतींमध्ये काय चुका होत आहेत?, कोणत्या अडचणींमुळे शासकीय योजनांचा गरजूंना लाभ होत नाही? त्या योजना जास्त कशा उपयुक्त ठरतील? इ.वावतीत तटस्थ भूमिकेतून संशोधन होणे गरजेचे आहे.तसेच आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, विज्ञानाचा प्रसार, भटक्या-विमुक्तांच्या रूढी, परंपरा, प्रमाणके, मूल्ये या सर्वांचा भटक्या विमुक्त जमातींच्या जीवनावर होणारा परिणाम त्यांच्यामध्ये होत असलेला वदल, यावावत शिवाय त्यांचा सामाजिक-आर्थिक, सामाजिक-मानसिक, सामाजिक-सांस्कृतिक असा तौलनिक साकल्यात्मक आणि समाजशास्त्रीय व मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास होणे जरूरीचे आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१. गर्गे स.मा.(संपादक), 'भारतीय समाज विज्ञान कोश', खंड-३, पहिली आवृत्ती झुंडशाही ते युरोकम्युनिझम पृ.क्र.३९२.

२. कित्ता, पृष्ठ क्र.३९२

३. मराठी विश्वकोश कोश खंड-१२ (भंगुरतारा ते महाराष्ट्र राज्य ) तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ - १९८५, पृ.क्र.१९.

४. Agarwal P.N., (Edited) 'Nalanda Concise Dictionary', Aadishesh Book Depot, New Delhi, Page No.652.

५. Allen R.E., (Edited), 'The Pocket Oxford Dictionary of Current English', Page No.497.

६. गर्गे स.मा.(संपादक), 'भारतीय समाज विज्ञान कोश', खंड-३, उपरिनिर्दिष्ट पृ.क्र.३९२.

७. मराठी विश्वकोश कोश खंड-१२ (भंगुरतारा ते महाराष्ट्र राज्य ) तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, उपरिनिर्दिष्ट, पृष्ठ क्र.१९

८. गर्गे स.मा.(संपादक), 'भारतीय समाज विज्ञान कोश', खंड-३, उपरिनिर्दिष्ट पृष्ठ.क्र.३९२.

९. कित्ता, पृष्ठ क्र.३९३

१०. कित्ता, पृष्ठ क्र.३९३

११. चव्हाण रामनाथ, 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृष्ठ क्र.७.

१२. htpp://www.nomadicdenotifiedtribesinmaharashtra.com.

१३. मराठी विश्वकोश कोश खंड-१२ (भंगुरतारा ते महाराष्ट्र राज्य ) तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, उपरिनिर्दिष्ट, पृष्ठ क्र.२०

१४. कित्ता, पृष्ठ क्र.२०

१५. मानवी विज्ञान परिषदचे त्रैमासिक, 'हाकारा' महाराष्ट्र राज्यद्वारा प्रकाशित, जानेवारी ते मार्च, १९८७, पृ.क्र.४.

१६. कित्ता, पृष्ठ क्र.६

१७. कित्ता, पृष्ठ क्र.६

१८. कित्ता, पृष्ठ क्र.७

१९. कित्ता, पृष्ठ क्र.८

२०. मराठी विश्वकोश कोश खंड-१२ (भंगुरतारा ते महाराष्ट्र राज्य ) तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, उपरिनिर्दिष्ट, पृष्ठ क्र.२१

२१. गर्गे स.मा.(संपादक), 'भारतीय समाज विज्ञान कोश', खंड-३, उपरिनिर्दिष्ट पृ.क्र.३९३.

२२. कित्ता, पृष्ठ क्र.३९४

२३. कित्ता, पृष्ठ क्र.३९४

२४. मानवी विज्ञान परिषदचे त्रैमासिक, 'हाकारा' महाराष्ट्र राज्यद्वारा प्रकाशित, उपरिनिर्दिष्ट, पृ.क्र.८.

२५. कित्ता, पृष्ठ क्र.८.

२६. कित्ता, पृष्ठ क्र.९.

२७. कित्ता, पृष्ठ क्र.१०.

२८. कित्ता, पृष्ठ क्र.१०.